भारती विदयापीठ पोलीस ठाणे
दिनांक-०३/०७/२०१८

# प्रेसनोट

## काात्रज नवीन बोगद्याजवळ पेट्रोल पंपावर दरोडा टाकण्याचे तयारीत असलेली टोळी अटकेत

### भारती विदयापीठ पोलीसांची कामगिरी

दिनांक ०३/०७/२०१८ रोजी रात्रौ भारती विदयापीठ पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असणारे तपास पथकाचे सहा.पोलीस उप-निरीक्षक श्री प्रदीप गुरव यांना त्यांचे खास बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, चार ते पाच इसम हे मुंबई बॅगलोर हायवेवरील हॉटेल मराठे शाही शेजारील नवीन झालेले पेट्रोल पंपावर दरोडा टाकणेचे तयारीत असुन ते सध्या दरी पुलापासुन काही अंतरावर अंधारात मोटार सायकल घेवुन थांबलेले असुन त्यांचेकडे धारदार हत्यारे आहेत अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने त्यांनी ताबडतोब सदरची माहीती श्री विष्णु पवार सो वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो भारती विदयापीठ पोलीस ठाणे यांना कळविली असता त्यांनी जास्तीत जास्त पोलीस स्टाफ बरोबर घेवुन जावुन ताबडतोब कारवाई करण्याबाबत आदेश दिल्याने सदर आदेशाप्रमाणे नाईट राउंड अधिकारी सहा.पोलीस निरीक्षक श्री चिवडशेटटी सो यांनी कर्मचा-यांचे दोन ग्रुप तयार करुन दत्तनगर चौक येथुन निघुन मुंबई बॅगलोर हायवेवरील मराठे शाही हॉटेल जवळ असलेले पेट्रोलपांच्या आडबाजुस अंधारात सापळा लावुन वॉच करीत थांबलो असता दोन मोटार सायकलवरुन ४ ते ५ इसम येताना दिसले त्यांचे दोन्ही मोटार सायकलच्या नंबर प्लेटला चुना लावुन नंबरप्लेट वरील नंबर झाकलेला दिसल्याने पेट्रोल पंपावर दरोडा टाकणारे हेच इसम आहेत अशी स्टाफची खात्री होताच स्टाफने ४ इसमांना होंडा स्टनर मोटार सायकलसह काही अंतरावर रात्रौ ००.५५ वा पकडले व त्यांचेपैकी एक इसम मोटार सायकल वरुन अंधारात कात्रज नवीन बोगदयाच्या दिशेने पळुन गेला. पकडलेले ४ इसमांना आहे त्या स्थितीत ठेवुन त्यांना त्यांचा नाव पत्ता विचारता १).प्रसाद संपत गायकवाड वय.२० वर्ष रा.लेन नं ४ कलवड वस्ती लोहगाव पुणे २) किरण शिवाजी डोळे वय.२३ वर्ष रा.आय्यप्पा मंदीरासमोर संतोषनगर कात्रज पुणे ३) शंकर रमेश भोसले वय.२१ वर्ष रा.बंगला नं ९ बी/८ शास्त्रीनगर येरवडा पुणे ४) मझहर आशपाक सय्यद वय.१९ वर्ष रा. ५०/५२ मस्जिद गल्ली येरवडा गावठाण पुणे असे यांना ताब्यात घेतलेले असुन त्यांचे ताब्यात तीन लोखंडी कोयते,चार मोबाईल हॅन्डसेट,एक मोटार सायकल असा कि.रु ५३,८००/-रु चा माल मिळुन आलेला असुन त्यांना अटक केलेली आहे. त्यांचा साथीदार गोपी वेताळ रा.संतोषनगर कात्रज पुणे हा अंधाराचा फायदा घेवून पळुन गेलेले असुन पुढील तपास पोलीस उप-निरीक्षक दत्तात्रय मोहीते भारती विदयापीठ पोलीस ठाणे हे करीत आहेत.

यातील अटक आरोपी क्रमांक १ हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असुन त्यांचेवर जबरीचोरी, वाहनचोरी असे गुन्हे दाखल असून आरोपी क्रमांक २ हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असुन त्यांचेवर दरोड्याचा प्रयत्न,जबरीचोरी,व शरीराविरुध्दचे गुन्हे दाखल असून तो सध्या पुणे शहर व जिल्हयातून दोन वर्षाकरीता तडीपार केलेले आहे.

**ही कारवाई मा.श्री डॉ.प्रविण मुंढे सो पोलीस उप-आयुक्त परि-२ पुणे, मा.डॉ.शिवाजी पवार सो सहा.पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग पुणे, मा.श्री विष्णू पवार सो, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विष्णू ताम्हाणे पोलीस निरीक्षक (गुन्हे), भारती विदयापीठ पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी सहा.पो.निरीक्षक श्रीशैल चिवडशेट्टी ,सहा.पो-उपनिरीक्षक प्रदीप गुरव,पोलिस हवालदार कृष्णा** निढाळकर,विनोद भंडलकर, गणेश सुतार, समीर बागसिराज,सुमित मोघे,शाम गावित,सागर जाधव,शिवदत्त गायकवाड,नागराळे,भादवे,पवार यांचे पथकाने केलेली आहे.

# प्रेसनोट

## पिस्टलची क्रेझ म्हणून पिस्टल बाळगणारा अटक

---

दिंनाक – ०२/०७/२०१८ रोजी भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन पुणे येथे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री कमलाकर ताकवले यांचे मार्गदर्शनानुसार सहा पोलीस निरीक्षक एस पी यादव व पोलीस उप निरीक्षक पी वाय ताटे व कर्मचारी पेट्रोलींग करित असताना सहा पोलीस निरीक्षक यादव यांना बातमीदारामार्फत माहीती मिळाली की , नाकोडा मंदिराजवळ, आगमपायथा आंबेगाव बुाा पुणे येथे काळी ट्रॅक पॅन्ट व निळा टिशट घातलेला, मजबुत शरिरयष्टी असलेला व त्याचे पाठीवर काळी सॅक असून त्यामध्ये गावठी कट्टा व काडतुसे असल्याचे खात्रीशीर बातमी मिळाली.

गस्त पथकास मिळालेल्या बातमीप्रमाणे आगमपायथा, आंबेगाव बु पुणे या ठिकाणी मिळालेल्या वर्णनाप्रमाणे एक संशयित इसम उभे असल्याचे दिसुन आले. गस्त पथकातील स्टाफच्या मदतीने सदर इसमास पकडुन ताब्यात घेतले त्याने त्याचे नाव व पत्ता सचिन विष्णु जागडे वय- ३२ वर्षे रा.फ्लॅट नं.४०२, श्री दत्त सहनिवास सोसायटी, धबाडी आंबेगाव बुाा पुणे असे सांगितले त्याच्या ताब्यातुन १ गावठी बनावटीचा कट्टा व ११ जिवंत काडतुसे जप्त करण्यात आले आहेत.सदर आरोपीवर भारती विदयापीठ पोलीस ठाणे येथे भारतीय हत्यार कायदा कलम ३ (२५) मु. पो. अधि. कलम ३७(१) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर कामगिरी परिमंडळ २ पुणे चे पोलीस उपायुक्त श्री प्रविण मुंडे सो, स्वारगेट विभाग पुणे चे सहाय्यक पोलीस आयुक्त श्री शिवाजी पवार सो यांचे मार्गदर्शनाखाली भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री कमलाकर ताकवले, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री विष्णु ताम्हाणे, सहा पोलीस निरीक्षक संदिप यादव, पोलीस उप-निरीक्षक पृथ्वीराज ताटे, पोलीस कर्मचारी नितिन धोत्रे, उज्वल मोकाशी, गणेश चिंचकर, शिवा गायकवाड, शशांक खाडे यांनी केलेली आहे.